# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### पंढरपूर (जि.सोलापूर) येथील रुग्णालयामधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१) १६५५८ (१४-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील शासकीय रुग्णालयात वारंवार समाजकंटकाच्या त्रासामुळे १२ डॉक्टरांनी सामुदायिक राजीनामे दिले असून त्यापैकी ७ डॉक्टर पुन्हा सेवेत रुजू झाले असून परंतु ५ डॉक्टर रुजू न झाल्यामुळे प्रसुतीविभाग बंद असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षकांसह काही महत्त्वाची पदे रिक्त असल्याने रुग्णालयातील अत्याधुनिक उपकरणे विनावापर पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न (१) नुसार येथील प्रसूतीगृहाला डॉक्टर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-११-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गातील ४ व १ वैद्यकीय अधिक्षक यांनी राजीनामे दिले आहेत ही बाब खरी आहे. तथापि, रुग्णालयातील प्रसुतीविभाग सुरु होता. माहे मे ते जून महिन्यामध्ये एकूण २१२ प्रसुती करण्यात आलेल्या आहेत.

(२) रुग्णालयातील कोणतेही अत्याधुनिक उपकरण विनावापर पडलेले नाही ते सध्या सुस्थितीत वापरात असून त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत नाही.

(३) उक्त प्रश्न भाग-१ च्या अनुषंगाने ४ स्त्रीरोग तज्ञांची नियुक्ती केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**राजापूर येथील ग्रामीण रुग्णालयाच्या जुन्या इमारतीची जागा वापरविना पडून असल्याबाबत.**

**(२) १९५८८ (१४-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उत्पन्नाचे मर्यादित स्त्रोत असलेल्या राजापूर येथील ग्रामीण रुग्णालयाच्या जुन्या इमारतीची जागा वापराविना पडून असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जुन्या इमारतीत मोकाट जनावरे, भटक्या कुत्र्यांचे वस्तीस्थान झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारत नगरपालिकेला हस्तांतरित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधिताकडे वारंवार पत्रव्यवहार करुनही अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालयाची जुनी इमारत नगरपालिकेला हस्तांतरित करण्याबाबत विलंब लागण्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-११-२०१६) :**(१) राजापूर (जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या जुन्या इमारतीची जागा वापराविना पडून असल्याची बाब खरी आहे. तथापि, त्याठिकाणी मोकाट जनावरे, भटक्या कुत्र्यांचे वस्तीस्थान झाले ही बाब खरी नाही.

(२), (३) व (४) याबाबत क्षेत्रीय स्तरावरुन प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत शासनस्तरावरुन निर्णय घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

**मौजे वरवंड (ता.दौंड, जि. पुणे) येथे ग्रामीण रुग्णालय होण्याबाबत**

**(३) २८३७४ (२१-०१-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वरवंड (ता.दौंड, जि.पुणे) आरोग्य केंद्रात अपुऱ्या सोईमुळे रुग्णांना खाजगी रुग्णालयात जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण रुग्णालय होणेबाबत निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. आरोग्य मंत्र्यांना माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने ग्रामीण रुग्णालय करणेबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-११-२०१६) :**(१) व (२) मौज वरवंड (तालुका दौंड, जि.पुणे) आरोग्य केंद्रात अपुऱ्या सोईमुळे रुग्णांना खाजगी रुग्णालयात जावे लागत आहे ही बाब खरी नाही. तथापि सन २०११ च्या जनगणनेनुसार रुग्णांना अधिक सुविधा मिळण्यासाठी ग्रामीण

रुग्णालय स्थापन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य यांना ऑक्टोबर, २०१५ मध्ये निवदेन दिलेही बाब खरी आहे.

(३) आगामी बृहत आराखड्यामध्ये सदर बाब समाविष्ट करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कुंडलवाडी (ता.बिलोली, जि.नांदेड) येथे ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्याच्या मागणीबाबत

**(४) ३२२३६ (२१-०१-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंडलवाडी (ता.बिलोली, जि.नांदेड) हे शहर महाराष्ट्र व तेलंगणा या राज्याच्या सीमेवर असून या शहराची लोकसंख्या २७ हजार तसेच लगतच्या परिसरात २० खेडी असून आरोग्य सुविधेच्या दृष्टीने येथे ग्रामीण रुग्णालय मंजूर करणेसंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजीपासून वारंवार मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने ग्रामीण रुग्णालय मंजूर करणेसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्यापर्यंत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार दि. १७.०१.२०१३ व दि.९.०६.२०१४ च्या शासन निर्णयान्वये राज्यात आरोग्य संस्था स्थापन / श्रेणीवर्धन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तद्नंतर लोकप्रतिनिधींकडून आरोग्य संस्था स्थापनेच्या प्राप्त होणाऱ्या निवेदनांच्या अनुषंगाने याबाबतचे राज्यभरातील प्रस्ताव निकषांनुसार तपासून एकत्रित जोड बृहत आराखड्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबतची कार्यवाही आरोग्य सेवा संचालनालयाच्या स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सहसंचालक हिवताप व हत्तीरोग पुणे यांचे विरोधात केलेल्या तक्रारीबाबत

**(५) ४१९०२ (१०-०५-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहसंचालक, हिवताप व हत्तीरोग, पुणे यांचे विरोधात दुरदर्शनची बोगस देयके, फायलेरिया किट दरकरार नसतानाही दरपत्रकास दाखवून ३७ लक्ष रुपयांची अनावश्यक खरेदी करुन गैरव्यवहार केल्याप्रकरणी चौकशी करण्याच्या प्रस्तावावर निर्णय घेतलेला आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे काणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीच कार्यवाही केलेली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काये आहेत तसेच सदर प्रकरणी दोषीविरोधात कारवाई करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२१-११-२०१६) :**(१) होय.
(२) तत्कालीन सहसंचालक, हिवताप व हत्तीरोग, पुणे यांच्याविरुध्द डॉ.सोळंके यांनी या विषयाबाबत लाचलुचपत विभागाकडे तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने डॉ.व्ही.डी. खानंदे, सहसंचालक हिवताप व हत्तीरोग यांच्याविरुध्द उक्त प्रकरणी उघड चौकशी करण्यास महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांना गृह विभागाने परवानगी दिली.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हदगांव (ता.जि.नांदेड) येथे सामाजिक वनीकरण कार्यक्रमाच्या माध्यमातून रस्ता व कालवा दुतर्फाची कामात बनावट मजूर दाखवून मोठ्या प्रमाणात झालेला गैरव्यवहार**

**(६) ४२७२८ (०७-०५-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हदगांव (ता.जि.नांदेड) येथे सामाजिक वनीकरण कार्यक्रमाच्या माध्यमातून रस्ता व कालवा दुतर्फाची कामे चालु असुन त्या कामात बनावट मजूर दाखवून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन चौकशी करुन दोषापितांवर कोणती कारवाई करणार वा करीत आहे,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-११-२०१६) :**(१) होय. अंशत: खरे आहे.
(२) श्रीमती विजया सुभाष गायकवाड ह्या महिला मजूरांची दि. ५.१२.२०१५ ते दि. ८.१२.२०१५ या कालावधीत वाकळी फाटा ते तळेगाव रस्ता दुतर्फा कामावर चुकीची उपस्थिती दाखविल्याचे निदर्शनास आले आहे. या कालावधीची मजूरीची रक्कम रू.७२४/- वसुल करण्याचे निर्देश संबंधितांना देण्यात आले आहेत. यासाठी जबाबदार असणारे ग्राम रोजगार सेवक श्री.सुभाष लक्ष्मण गायकवाड यांच्या सेवा संपुष्टात आणण्याबाबत लागवड अधिकारी, हदगाव यांनी तहसिलदार हदगाव यांना कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात राजीव गांधी जीवनदायी योजना राबविण्याऱ्या खाजगी रुग्णालयात आँजिओप्लाटी शस्त्रक्रियेसाठी रुग्णांकडून अतिरिक्त रक्कम घेत असल्याबाबत**

**(७) ४२८११ (१०-०५-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वसामान्यासाठी वरदान ठरलेल्या राजीव गांधी जीवनदायी योजना राबविण्याऱ्या खाजगी रुग्णालयात ऑजिओप्लाटी सारख्या शस्त्रक्रियेसाठी ही रुग्णालये रुग्णांकडून अतिरिक्त रक्कम घेत असल्याची माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन खाजगी रुग्णालयाकडून अतिरिक्त रकमांची मागणी करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-११-२०१६) :**(१) होय.

ॲन्जिओप्लॉस्टीसारख्या शस्त्रक्रियेसाठी माहे जानेवारी, २०१६ मध्ये रुग्णांकडून अतिरिक्त पैशाची मागणी अथवा पैसे घेण्यात आल्याच्या २३ रुग्णालयांकडील ४६ तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(२) उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने विमा कंपनीद्वारे नियुक्त टि.पी.ए. मार्फत चौकशी केली असून सर्वच २३ रुग्णालयांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. १९ रुग्णालयांनी सदर नोटीस समाधानकारक उत्तर दिलेली आहे. ३ रुग्णालयांनी असमाधानकारक उत्तर दिल्याने रुग्णालय अंगीकरण समितीच्या निर्णयानुसार त्यांचे निलंबन रद्द केले होते. रुग्णालयाविरुध्द असलेल्या तक्रारीचे निवारण झाल्यानंतर त्यांचे निलंबन रद्द केले आहे. सद्य:स्थितीत एका रुग्णालयाचे अंगीकरण रद्द (De-empanelled) केलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयात बालगुन्हेगारीला प्रतिबंध घालण्याबाबत**

**(८) ४३००२ (१७-०५-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा न्यायालयांतर्गत बाल न्यायालयात माहे नोव्हेंबर, २०१५ पर्यंत १०६४ खटले सुरू असून त्यामधील संशयीत बालगुन्हेगारांची संख्या सुमारे दीड हजार असल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील बालगुन्हेगारीला प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-११-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

नाशिक जिल्हा बाल न्यायालयांतर्गत नोव्हेंबर, २०१५ पर्यत १०६४ खटले सुरु असून, पोलिस आयुक्तालय नाशिक शहर यांच्या कार्यकक्षेत सन २०१३ ते मे २०१६ पर्यंत ५३४ बाल गुन्हेगारांना ताब्यात घेण्यात आले आहे.

(२) बालगुन्हेगारीस आळा घालण्यासाठी बाल न्याय मंडळ नाशिक यांच्या आवारात समुपदेशन केंद्र सुरु करण्यात आले आहे. बाल गुन्हेगारांचे समुपदेशन करण्यात येऊन त्यांना सुधारण्याची संधी देण्यात येत आहे. तसेच त्यांच्या पालकांनाही वेळोवेळी भेटी देऊन त्यांचेही समुपदेशन करण्यात येते. तसेच पोलिस विभागामार्फत विविध शाळा/महाविद्यालय यामध्ये विद्यार्थ्यांच्या बेठका आयोजित करुन त्यांना गुन्हेगारी विश्वापासून दूर राहण्याबाबत समुपदेशन व मागदर्शन करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्हा रुग्णालयातील दयनीय अवस्थेबाबत**

**(९) ४४९६५ (१०-०५-२०१६). अॅड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.आर. टी. देशमुख (माजलगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा रुग्णालय, बीड येथील सिटी स्कॅन मशिन गेल्या वर्षभरापासून बंद असल्याने सद्य:स्थितीत रुग्णांना खाजगी रुग्णालयांत अवाजवी शुल्क भरुन संबंधित तपासणी करावी लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहेक काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत सदर रुग्णालयातील वॉशिंग मशीनही बंद असूनही रुग्णालयातील शौचालयांचे पाईप फुटल्याने सांडपाणी रस्त्यावर वाहत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी शासनाकडून करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले आहे आणि सदर रुग्णालयातील गैरसोयी तातडीने दूर करुन रुग्णालयांत अत्याधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती ठोस कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-११-२०१६)** :(१) अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, बीड येथील सी.अी. स्कॅन मशीन दि.२१.०५.२०१६ पासून बंद आहे. तथापि, या मशिनद्वारे माहे मे, २०१६ अखेर १७० चाचण्या करण्यात आल्या आहेत. दरम्यान, जानेवारी, २०१६ वा त्यादरम्यान रुग्णांना खाजगी रुग्णालयात अवाजवी शुल्क भरुन संबंधित तपासणी करावी लागत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

सदर रुग्णालयातील लॉण्ड्री मशिन नादुरुस्त आहे. सदर मशिन दुरुस्त करण्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक यांना आरोग्य सेवा संचालनालय स्तरावरुन दि.१.०६.२०१६ रोजी निर्देश देण्यात आले आहेत. रुगणालयातील कक्ष क्र.6 मधील शौचालयाचे पाईप फुटल्याने सांडपाणी रस्त्यावर वाहत होते. सद्यस्थितीत पाईपलाईनची दुरुस्ती करण्यात आली आहे. तसेच विधी व न्याय विभागाच्या दि.१९.०५.२०१५ च्या शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील २६ रुग्णालयांना सी.टीस्कॅन मशीन व एक्स-रे मशीन खरेदीकरीता श्री.साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेमार्फत अर्थसहाय्य करण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये जिल्हा रुगणालय बीड येथील सी.टी.स्कॅन मशीनचा समोवश असून खरेदीची विहीत प्रक्रिया सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील पेठ तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णांना आरोग्य विषयक सोयी-सुविधा मिळत नसल्याबाबत**

**(१०) ४७२८६ (११-०५-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील पेठ तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील दोन वैद्यकीय अधिकारी परिसरातील रुग्णांना सकाळी ११ ते २ अशी तीन तास सेवा देत असल्याने दाखल झालेल्या रुग्णांना हाल होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुका आरोग्य विभागाकडे नागरिकांनी याबाबत तक्रार केली असता अद्यापही त्यांच्यावर कारवाई झाली नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार सदरहू दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली आहे वा करण्यात आली आहे,
(५) अद्याप कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२१-११-२०१६) :**(१) अंशत खरे आहे.
(२) पेठ तालुक्यात एकंदर ७ प्रा.आ.केंद्र कार्यरत असून यापैकी जोगमोडी येथील प्रा.आ.केंद्राबाबत तालुका आरोग्य अधिकारी यांचेकडे नागरीकांनी तक्रार केली होती. त्यानुसार सदरचे वैद्यकीय अधिकारी यांचेवर कारवाई करण्यात आली आहे.
(३) चौकशी करण्यात आली आहे.
(४) जिल्हा परिषद कार्यालयाचा आदेश जा.क्र. आरोग्य / आस्था १/७८१/२०१४, दि.७.१०.२०१४ अन्वये संबंधित वैद्यकीय अधिकारी यांचा घरभाडे व व्यवसारोध भत्ता बंद करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडून प्रस्ताव मागविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चांडोली (ता.खेड, जि.पुणे) ग्रामीण रुग्णालय येथे नेत्र शस्त्रक्रियागृह नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत

**(११) ४८१९० (११-०५-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांडोली (ता.खेड,जि.पुणे) ग्रामीण रुग्णालय येथे नेत्र शस्त्रक्रिया गृह नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नेत्र शस्त्रक्रिया गृह सुरु करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १३ जानेवारी, २०१६ वा त्यासुमारास मा.आरोग्य मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने नेत्र शस्त्रक्रिया गृह सुरु करणेबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-११-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.
चांडोली येथे नेत्र शस्त्रक्रिया गृह नाही. तथापि रुग्णांची गैरसोय होत नसून त्यांच्या शस्त्रक्रिया ससून रुग्णालयामध्ये केल्या जातात.
(२) हे खरे आहे.

(३) पुणे जिल्हयातील जिल्हा रुग्णालय, पुणे व ससून रुग्णालय, पुणे येथे स्वतंत्र नेत्र शस्त्रक्रिया गृह असून वरील दोन ठिकाणी पुणे जिल्हयातील सर्व ठिकाणचे मोतीबिंदु रुग्ण संदर्भित केले जातात. शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना त्यांच्या पूर्व ठिकाणी सोडण्यात येऊन पुढील उपचार त्या त्या विभागातील नेत्र शल्य चिकित्सक आणि नेत्रचिकित्सा अधिकारी यांच्यामार्फत करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर रुग्णालयासाठी केंद्र शासनाकडून अनुदान मिळणेबाबत**

**(१२) ४९८३७ (०३-०५-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर रुग्णालयासाठी केंद्र शासनाकडून अनुदान मिळणे अपेक्षित असून याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे गत दिड वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्ताव शासनाने त्वरीत मंजूर करुन केंद्र शासनाकडून त्वरीत अनुदान मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-११-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) दि.२८.७.२०१६ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी कॅन्सर रुग्णालयासोबत सामंजस्य करार केला आहे व तो अंतिम मान्यतेसाठी केंद्र शासनास पाठविण्यात आला आहे. तसेच यासाठी लवकरात लवकर अनुदान वितरीत करण्याची विनंती केंद्र शासनास करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर जिल्हयातील ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य रुग्णालयातील असुविधेबाबत**

**(१३) ५०८४५ (११-०५-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्हयातील ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैदकीय अधिकारी रुग्णालयात व मुख्यालयी हजर राहत नसल्यामुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसल्याची माहिती दिनांक १२ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीत काय निष्पन्न झाले व संबधित दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(४) अद्यापि कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-११-२०१६) :**(१) अंशतः खरे आहे.
(२) होय.
(३) मुख्यालयी गैरहजर राहणाऱ्या अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येवून त्यांना समज देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा जिल्हा रुग्णालयात रुग्णांना सोयी-सुविधा पुरविण्याबाबत

**(१४) ५२०७२ (११-०५-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हा रुग्णालयात रुग्णांना सोयी-सुविधा पुरविण्यात अपयश येत असल्याने रुग्णालयाच्या कारभारावर प्रशासनाचे नियंत्रण आहे की नाही असा प्रश्न त्यामुळे निर्माण होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी करुन या रुग्णालयाच्या कारभारात सुधार करुन येथे येणाऱ्या सर्वसामान्य रुग्णांना योग्य सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.
सातारा जिल्हा रुग्णालयात उपलब्ध सुविधांद्वारा रुग्णांना चांगल्याप्रकारे सेवा देण्यात येत असून माहे डिसेंबर, २०१५ वा त्यासुमारास रुग्णालयाच्या कारभारावर प्रशासनाचे नियंत्रण नसल्याची कोणतीही घटना निदर्शनास आलेली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे गुंजोटी (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) येथील नागरी दवाखान्यांचे प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये रूपांतर करण्याची मागणी

**(१५) ५२५३४ (११-०५-२०१६). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे गुंजोटी (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) येथील नागरी दवाखान्यांचे प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये रूपांतर करण्यात यावे, अशी मागणी तेथील ग्रामस्थांनी तसेच औसाचे मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० जून, २०१२ रोजी तसेच तुळजापूरचे लोकप्रतिनिधीनी व

तत्कालीन पशुसंवर्धन दुग्धविकास मंत्री यांनी दिनांक ३ ऑक्टोबर २०१३ रोजी मा.सार्वजनिक आरोग्यमंत्री, सहसंचालक आरोग्य सेवा, (प्राआकेंजिपस्तर) तसेच सचिव, सार्वाजनिक आरोग्य विभाग आदीकडे केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे

(३) अद्यापी निर्णय घेतला नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-११-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारीत निकषांनुसार आरोग्य संस्था स्थापना/श्रेणीवर्धन करण्याबाबतचा जोड आराखडा तयार करण्याच्या अनुषंगाने प्राप्त झालेले प्रस्ताव तपासण्याची कार्यवाही करण्याबाबत आरोग्य सेवा संचालनालयास सूचीत करण्यात आले आहे. निकषांत बसत असल्यास या प्रस्तावाचा सदर जोड आराखड्यात समावेश करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरामध्ये कृत्रिम दात तयार करणाऱ्या २० प्रयोगशाळा बनावट असल्याबाबत**

**(१६) ५४२२१ (२२-०८-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरामध्ये कृत्रिम दात तयार करणाऱ्या २० बनावट प्रयोगशाळा आहेत तसेच संपूर्ण राज्यात १२०० च्या वर कृत्रिम दात तयार करणाऱ्या प्रयोगशाळा आहेत, हे खरे आहे काय**,**

(२) असल्यास, नागपूर पोलीस आयुक्तांकडे १८ बनावट तंत्रज्ञाच्या तक्रारी आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा बनावट प्रयोगशाळेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

तसेच दंत अभिनियम १९४८ व मुंबई दंत नियम १९५१ अन्वये कृत्रिम दात तयार करणाऱ्या प्रयोगशाळेची नोंद घेण्याची तरतूद नाही.

(२) हे खरे नाही.

परंतु महाराष्ट्र दंत परिषद यश कार्यालयाकडे नागपूर जिल्हयातील एकूण १९ व्यक्तीविरुध्द आजपर्यंत तक्रार प्राप्त झालेली आहे.

(३) निरंक,

तथापि, आजपर्यंत नागपूर जिल्हयातील एकूण १९ व्यक्ती विरुध्द तक्रार महाराष्ट्र राज्य दंत परिशदेकडे प्राप्त झाली व दंत अधिनियम १९४८ कलम ३८ अन्वये त्यापैकी २ व्यक्ती या नोंदणीकृत दंत कारागीर (नोंदणीकृत कृत्रिम दात तयार करणारे तंत्रज्ञ) आहेत ते वगळून

उर्वरित १७ व्यक्तींविरुध्द तक्रारीच्या अनुषंगाने शहानिशा करुन दंत अधिनियम १९४८ च्या कलम ४७, ४८, ४९ या कलमांचे उल्लंघन करित असलेल्या व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत दि.१४.०३.२०१६ रोजी पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांना विनंती करण्यात आली आहे.
(४) निरंक.

---

**राज्यातील कनिष्ठ किटकशास्त्रज्ञांच्या रिक्त पदांबाबत**

**(१७) ५४२५५ (३०-०८-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-कीटकरोग शास्त्रज्ञांच्या नऊ पैकी तब्बल सात जागा रिक्त असल्याने डासांचा बंदोबस्त करणारी व्यवस्था कमकुवत झाल्याने कीटकजन्य रोगाच्या तापाला प्रतिबंध करण्यात अपयश येत असल्याची बाब माहे जून, २०१६ दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रोगनियंत्रणाची ही व्यवस्था कमकुवत झाल्याने राज्यात डेंग्यूचा प्रसार वाढला असल्याचे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती ठोस पावले उचलली आहेत काय,
(४) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,
(५) सदर तपशील उपलब्ध नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२२-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.
तथापि, राज्यामध्ये कनिष्ठ किटकशास्त्रज्ञांच्या १० पदांपैकी ८ पदे रिक्त आहेत हे खरे आहे. मात्र डास अळी सर्वेक्षण आणि डास नियंत्रणाचे काम जिल्हा स्तरावरुन किटकसमाहरकांमार्फत तर उपकेंद्र स्तरावरुन आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत नियमित स्वरुपात करण्यात येत असल्याने कीटकजन्य रोगांना प्रतिबंध करण्यासंदर्भातील यंत्रणा व्यवस्थित कार्यरत आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
वातावरणातील बदल अनियमित पर्जन्यमान वाढते शहरीकरण, इतर राज्यातून लोकांची ये-जा, पाणी साठवून ठेवण्याच्या सवयी. इ. कारणामुळे राज्यांमध्ये काही प्रमाणात डेंग्यूंचा प्रादुर्भाव आहे.
(३) डेंग्यू प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक कार्यवाही आरोय विभागामार्फत नियमितपणे सुरु असून सदरची रिक्त पदे भरण्याबाबत विभागामार्फत पाठपुरावा सुरु आहे.
(४) कनिष्ठ किटकशास्त्रांची पदे भरण्याकरिता सेवा प्रवेश नियमांचे पुनरावलोकन शासनाच्या विचाराधीन असून नामनिर्देशाने पदे भरण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाडा तालुक्यातील (जि.पालघर) सुपोंडे जंगलातून खैरांच्या लाकडांची चोरीबाबत**

**(१८) ५४४०८ (२४-०८-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा तालुक्यातील (जि.पालघर) सुपोंडे जंगलातून खैरांच्या लाकडांची चोरटी वाहतूक करणारा ४०७ हया प्रकाराचा टेम्पो वाडा, विक्रमगड, कंचाड वन क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांनी पकडून त्यात ४ लाखांचा माल जप्त करण्यात आल्याची माहिती दिनांक २३ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खैरांच्या लाकडांची अनधिकृतपणे चोरी होत असून अलिकडच्या काळातील तिसरी मोठी कारवाई आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाबत पोलिसांनी संबंधितांना गुन्हा दाखल केला आहे काय असल्यास दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे

(४) तसेच भविष्य अशा गैरप्रकारास आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती खबरदारीची उपाययोजना केलेली आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-११-२०१६) :**(१) हे खरे आहे.

वन विकास महामंडळाचे नाशिक प्रदेशाअतर्गत ठाणे वन प्रकल्पातील वनक्षेत्रपाल व त्यांचे कर्मचारी २२.५.२०१६ रोजी वनक्षेत्रात गस्त करीत असताना, खैर मालाची चोरटी करणारा टेम्पो क्र. एमएच-०४/एफडी/५७१८ अवैध खैर माल भरलेला आढळला. (२३ नग, २३७३ घ.मी. खैर इमारती) टेम्पोचा चालक अंधाराचा फायदा घेवून पळून गेला, टेम्पो व माल जप्त करुन शिरसाट डेपो येथे पाठविण्यात आला आहे. जंगल तपासणी केली असता, सदर ठिकाणी ६ खैर बुडे चोरट्या तोडीची आढळून आली असून, पीओआर क्र.सी-३/२०१६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्याची किंती रु. ३५,७३६/- आहे.

(२) ठाणे वन प्रकल्प विभागात खैर लाकडाची अवैध वृक्ष तोड होण्याचया सन २०१३-१४ मध्ये १, २०१४-१५ मध्ये ३, २०१६-१७ मध्ये आहे ऑक्टोबर, २०१६ अखेर १ अशा घटना निदर्शनास आल्या.

(३) वन गुन्ह्याची चौकशी सुरु आहे.

(४) ठाणे वन प्रकल्प विभागातील क्षेत्रिय कर्मचारी व वरीष्ठ अधिकारी अशा प्रकारच्या चोरट्या तोडीला प्रतिबंध करण्याकरिता दिवस रात्र जंगलात गस्त घालून, धडक कार्यवाही करतात. फिरते पथकही वन विभागाच्या कर्मचाऱ्यासह संयुक्त गस्त देखील घालतात. ग्रामस्थांच्या समन्वयाने गावागावा मध्ये जंगल संरक्षणाबाबत जनजागृती करण्यात येते. प्रसंगानुरुप पोलीसांची मदत घेण्यात येते.

---

**मराठवाड्यात सन २०१५-१६ वर्षातील जलयुक्त शिवार योजनेतील मंजूर कामापैकी ५०% कामे अद्यापही अपूर्ण असल्याबाबत**

**(१९) ५४४२३ (२४-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात सन २०१५-१६ मध्ये जलयुक्त शिवार योजनेत निवडलेल्या गावापैकी जवळपास १००० पेक्षाही अधिक गावातील मंजूर कामापैकी ५०% हि कामे आजतागायत पूर्ण झाली नसल्याची माहिती दिनांक २४ मे २०१६ रोजी वा त्यासुमारास आढळून आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व सदर अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती व सदर कामे पूर्ण करण्यास शासनास किती कालावधी लागेल ?

**प्रा. राम शिंदे (१७-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

मराठवाड्यात सन २०१५-१६ मध्ये जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत आठ जिल्ह्यांमध्ये १६८२ गावांची निवड करण्यात आली आहे. जिल्हास्तरीय आराखड्यानुसार ७७५६७ कामे मंजूर करण्यात आली त्यापैकी ६५६०५ कामे सुरु करण्यात आली आहेत. सुरु करण्यात आलेल्या कामांपैकी ५७०३७ कामे पूर्ण करण्यात आली असून ८५६८ कामे प्रगतिपथावर आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सन २०१४-१५ या वर्षापेक्षा सन २०१५-१६ या वर्षात कावीळच्या रोगाने बालमृत्युबाबत**

**(२०) ५४४७९ (३०-०८-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१४-१५ या वर्षापेक्षा सन २०१५-१६ या वर्षात कावीळ या रोगराईमुळे बालमृत्युचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कावीळ रोगाचे उच्चाटन करण्याकरीता शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली आहे,

(३) असल्यास, अद्याप उपाययोजना केली नसल्यास कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२२-११-२०१६)** :(१) हे खरे नाही.

सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या दोन्ही वर्षात राज्यात काविळीमुळे २० बालमृत्यू झालेले आहेत.

(२) कावीळ हा आजार मुख्यत्वे दोन प्रकारचा आहे.

१) जलजन्य कावीळ (A व E)

२) रक्त व शरीरद्रव्यावाटे पसरणारी कावीळ (B, C व D)

या दोन्ही प्रकारच्या कावीळीच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी खालील उपाययोजना नियमितपणे केल्या जातात.

- पाणी गुणवत्ता नियंत्रण
- पेयजलाचे नियमित शुध्दीकरण
- हिपाटायटीस बी प्रतिबंधासाठी नवजात बालकाचे लसीकरण.
- हिपाटायटीस बी व सी करीता रक्तदानावाटे संकलित रक्ताची तपासणी.
- कावीळ प्रतिबंधासाठी जनतेचे आरोग्य शिक्षण.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ शहराच्या पश्चिमेकडील खुटंवली, जावसई गावालगत असलेल्या जलाशयातील गाळ काढण्याबाबत**

**(२१) ५४६०३ (२४-०८-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ शहराच्या पश्चिमेकडील खुटंवली, जावसई आदी डोंगर रांगाच्या भागात पाण्याचे जिवंत झरे असून जावसई गावालगत असलेल्या जलाशयातील गाळ काढून त्यांची उंची वाढवून पाण्याचा साठा वाढविण्याबाबत तसेच झरे स्वच्छ करून पाण्याचे बंधारे बांधण्याबाबत माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्या दरम्यान ग्रामस्थांसह स्थानिक लोकप्रतिनिधींनी जलसंपदा विभाग तसेच वन विभागाकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,अरविंद वालेकर, संचालक, मानव सेवा चेरिटेबल ट्रस्ट यांनीही नागरीकांच्या सहभागातून पाण्याचे बंधारे बांधण्याची तयारी दर्शविली असून त्यासंदर्भात जलसंपदा विभागाकडे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनांनुसार जावसई गावातील सदरहू जलाशयातील गाळ काढण्याबाबत आणि जीवंत झरे स्वच्छ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२६-१०-२०१६) :**(१) व (२) अशा प्रकारची निवेदने आढळून येत नाहीत.
(३) मौजे-जावसई या पाझर तलावाची गाळ काढून उंची वाढविणे संदर्भात ग्रामस्थ व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लघु सिंचन (जिल्हा परिषद) ठाणे विभागाकडे मागणी केलेली नाही. तथापि, तहसिलदार, अंबरनाथ यांचेकडे स्थानिक ग्रामस्थांनी पाझर तलावातील गाळ काढणेबाबत माहे मे, २०१६ महिन्यात तोंडी मागणी केली होती. त्यानुषंगाने उप अभियंता, लघु सिंचन उप विभाग, अंबरनाथ यांनी तहसिलदार अंबरनाथ यांचे सोबत प्रत्यक्ष पाझर तलावाची दिनांक १३ मे, २०१६ रोजी पाहणी केली होती. त्यावेळी पाझर तलावात जास्त प्रमाणात पाणी साठा असल्यामुळे पाझर तलावातील गाळ काढणे शक्य नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे लोकसहभागातून गाळ काढणेचे काम होवू शक्ले नाही. सध्या जावसई व खुटंवली ही गावे अंबरनाथ नगरपरिषद हद्दीत समाविष्ट आहेत. जावसई पाझर तलावाच्या परिसरात नागरीकरण झालेले आहे. सदर तलाव अंबरनाथ नगरपरिषदेकडे हस्तांतरण करणेचा प्रस्ताव ठाणे जिल्हा परिषदेच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य बाल हक्क संरक्षण आयोगात गेल्या पाच वर्षापासून**
**अध्यक्ष व सदस्यांची नियुक्तीच झाली नसल्याबाबत**

**(२२) ५४६७३ (२४-०८-२०१६). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य बाल हक्क संरक्षण आयोगात गेल्या पाच वर्षापासून अध्यक्ष व सदस्यांची नियुक्तीच झाली नसल्याचे नुकतेच माहे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्य महिला आयोगाच्या सचिवाचे पदही रिक्त असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पदे रिक्त असल्यामुळे आयोगाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय.
(४) तसेच म्हाडाच्या वांद्रे येथील इमारतीच्या पोटमाळयावर राज्य महिला आयोग कार्यालयाचे थकीत असलेले भाडे न भरल्यामुळे जागा रिकामी करण्याबाबत म्हाडाने आयोगाला नोटिस पाठविलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त पदे तात्काळ भरण्याबाबत व महिला आयोगाच्या कार्यालयाचे थकीत भाडे भरण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-११-२०१६) :**(१), (२), (३) व (४) होय.
(५) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आरोगावर अध्यक्ष व ६ सदस्य यांची नियुक्ती शासन अधिसूचना दि.०२.१२.२००८ नुसार करण्यात आली होती. त्यांची मुदत दि.०१.१२.२०११ रोजी संपुष्टात आलेली आहे. अध्यक्ष व सदस्यांची पदे भरणेबाबतच्या नवीन प्रस्तावावर कार्यवाही

सुरु असतांना लोकसभा निवडणूक-२०१४ ची आचार संहिता लागू झाल्याने याबाबत कोणताही निर्णय झाला नाही. तद्नंतर सदर प्रस्ताव कार्यवाहीसाठी सादर करण्यात आला असता, मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे फोरम फॉर फेअरनेस इन एज्युकेशन यांनी दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.८४/२०१३ च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार कार्यवाही सुरु असल्याने यावर निर्णय होऊ शकला नाही. आता मा.उच्च न्यायालयाच्या सर्व आदेशाची पूर्तता झाल्याने दिनांक १३.०८.२०१६ रोजी जाहिरात देण्यात आली असून, शासन निर्णय दिनांक २०.०७.२०१६ अन्वये मा.मंत्री (म व बा वि) यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय निवड समिती गठित करण्यात आली आहे. त्यानुसार अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्ती बाबतची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव पदावर अधिकारी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन करण्यात येत आहे. सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांच्याकडे सोपविण्यात आलेला आहे.

तसेच म्हाडा कार्यालयाने जवळपास २० पट भाडेवाढ केल्यामुळे याबाबत संबंधीतांकडे भाडेवाढी संदर्भात फेरविचार करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

---

**राज्यातील सुकन्या योजनेचे अर्ज छाननी प्रकियेत आयुर्विमा महामंडळात अडकल्याबाबत**

**(२३) ५४९३८ (२४-०८-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्त्री-भ्रूणहत्या रोखणे, मुलीचे शिक्षण व आरोग्य सुधारणे, बालविवाह रोखणे आणि मुलींच्या भविष्यासाठी आर्थिक तरतूद करण्याच्या दृष्टीकोनातून माहे जानेवारी, २०१४ पासून सुकन्या योजना राबविण्यात आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेतील आयुर्विमा महामंडळात २७ हजार अर्ज छाननी प्रक्रिया प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रलंबित अर्जाची तातडीने निपटारा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच "माझी कन्या भाग्यश्री" योजनाही वर्षभरापासून कागदावरच आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या योजनांची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-११-२०१६) :**(१) होय.

(२) भारतीय आयुर्विमा महामंडळाकडे २६८६२ अर्ज प्रलंबित आहेत.

(३) प्रलंबित अर्जाचा तातडीने निपटारा होण्यासाठी भारतीय आयुर्विमा महामंडळ यांच्याकडे पाठपुरावा सुरु असून भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या अधिकाऱ्यांसोबत आयुक्त महिला व बाल विकास, पुणे यांच्या स्तरावर बैठक घेऊन तात्काळ प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग दि. २६/०२/२०१६ अन्वये माझी कन्या भाग्यश्री ही योजना दिनांक ०१/४/२०१६ पासून राज्यात लागू करण्यात आली आहे.

(५) माझी कन्या भाग्यश्री ही योजना शासन निर्णय दि.२६/०२/२०१६ अन्वये दिनांक ०१/०४/२०१६ पासून राज्यात लागू करण्यात आली आहे. तसेच सन २०१६-२०१७ च्या आर्थिक वर्षात या योजनेसाठी रुपये २५.०० कोटी एवढा निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

---

**भूम-परांडा-वाशी तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत कामे मंजूर करणेबाबत**

**(२४) ५५२९८ (२४-०८-२०१६). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूम-परांडा-वाशी तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत किती कामे सन २०१६-१७ या वर्षाकरीता मंजूर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी किती कामे पूर्ण करण्यात आली आहेत व किती कामे अपूर्ण आहेत,

(३) असल्यास,अनेक कामावर निधी खर्च न केल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनाकडे दिनांक २५ मे, २०१६ रोजीच्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**प्रा. राम शिंदे (१८-११-२०१६) :**(१) सन २०१६-१७ या वर्षात जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत भून, परांडाव वाशी तालुक्यात अनुक्रमे २२५५, २५७० व ११४३ कामे मंजूर करण्यात आली आहेत.

(२) भूम, परांडा व वाशी तालुक्यात अनुक्रमे १३, २७२ व २८ कामे पूर्ण करण्यात आली असून २२४२, २२९८ व १११५ कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) अपूर्ण कामे पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**पुणे जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत घेतलेल्या २०० गावापैंकी १३० गावांत १०० टक्के कामे झाली असून ७० गावांतील कामे अद्यापपर्यंत अपूर्णावस्थेत**

**(२५) ५५६२२ (२४-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत घेतलेल्या २०० गावापैंकी १३० गावांत १०० टक्के कामे झाली असून ७० गावांतील कामे अद्यापपर्यंत अपूर्ण असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करणार आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१७-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) अपूर्ण कामे माहे डिसेंबर २०१६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. १५ सप्टेंबर, २०१६ अखेर २०० गावांपैकी १८७ गावात १०० टक्के कामे पूर्ण व १३ गावात ८० टक्के कामे पूर्ण झाली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात आदिवासींसाठी राखीव असलेल्या एमबीबीएसच्या जागा आदिवासी जातीचे प्रमाणपत्र नसणाऱ्या बनावट उमेदवारांकडे हमीपत्रावर भरल्या जात असल्याबाबत**

**(२६) ५६२९४ (१२-०८-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासींसाठी राखीव असलेल्या एमबीबीएसच्या जागा आदिवासी जातीचे प्रमाणपत्र नसणाऱ्या बनावट उमेदवारांकडे हमीपत्रावर भरल्या जात आहेत यामुळे मुळ आदिवासी मुले प्रवेशापासून वंचित राहत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जातवैधता प्रमाणपत्र तपासून एमबीएसएसला प्रवेश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-११-२०१६) :**(१) नाही. हे खरे नाही. परंतु दिनांक १४ जून, २०१६ ते २ जुलै, २०१६ या कालावधीत आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता राबविण्यात येणाऱ्या एमएचटी-सीईटी-२०१६ च्या पसंतीक्रम अर्ज भरण्याच्या प्रक्रियेमध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक ६९७१/२०१६ च्या प्रकरणी दिनांक २२ जून, २०१६ दिलेल्या

आदेशानुसार वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांकडून हमीपत्र भरुन घेऊन सदरची प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे.

(२) मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सेनगांव तालुक्यातील (जि.हिंगोली) सुकळी ब्रु. येथे जलयुक्त शिवार योजनेतून होत असलेल्या सिमेंट बंधाऱ्याचे कामे निकृष्ट दर्जाचे होत असल्याची तक्रार

**(२७) ५६३३२ (२४-०८-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगांव तालुक्यातील (जि.हिंगोली) सुकळी ब्रु. येथे जलयुक्त शिवार योजनेतून होत असलेल्या सिमेंट बंधाऱ्याचे कामे निकृष्ट दर्जाचे होत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सेनगाव तालुक्यातील सुकही बु. येथील सिंमेंट बंधारे कामांची चौकशी करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सहाय्यक कार्यकारी अभियंता पूर्णा पाटबंधारे विभाग, जलतज्ञ व तालुका कृषि अधिकारी, सेनगाव यांचे पथक स्थापन करण्यात आले होते. सदर पथकाने समस्थ तक्रारदार, गावकरी व कंत्रारटदार यांचे सक्षम कामांचे मोजमाप केले असून काम शासकीय मापदंडाप्रमाणे करण्यात आल्याचे आढळून आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उष्माघाताने ९ जणांना मृत्यु झाल्याबाबत

**(२८) ५६९२१ (३०-०८-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उष्माघाताने सुमारे २२ जणांचा मृत्यु झाल्याचे माहे मे २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार उष्माघाताने मृत्यु झालेल्या मृतांच्या कुटुंबियांना नैसर्गिक आपत्ती दाखल कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच मदत केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२२-११-२०१६)** :(१) हे अंशतः खरे आहे.

राज्यात १ एप्रिल, २०१६ ते ३० जून, २०१६ या कालावधीत उष्माघातामुळे १९ जणांचा मृत्यू झाला आहे.
(२) राज्यात दरवर्षी एप्रिल ते जून या कालावधीत उष्माघात विषयक परिस्थितीचा दैनंदिन आढावा घेण्यात येतो.
(३) राज्यात उष्माघाताने झालेल्या मृत्यूपैकी १० मृत्यू एप्रिल महिन्यात व ९ मृत्यू मे महिन्यात झालेले आहेत. जळगाव आणि औरंगाबाद जिल्ह्यात प्रत्येकी ४ मृत्यू असून नांदेड जिल्ह्यात ३ मृत्यू झाले आहेत. हिंगोली, बीड आणि चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी २ मृत्यू झाले असून अमरावती व पुणे जिल्ह्यात प्रत्येकी १ मृत्यू झाला आहे.

उष्माघाताने मृत्यू झालेल्या मृतांच्या कुटुंबियांना कोणतीही आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.
(४) उष्माघाताने मृत्यू झालेल्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यासंदर्भात कोणतीही शासकीय योजना नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यातील कऱ्हांडला अभयारण्यात असलेल्या वीटभट्ट्यामुळे वन्य प्राण्याच्या जीवाला धोका निर्माण झाल्याबाबतची बाब

**(२९) ५७८५१ (२४-०८-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यातील कऱ्हांडला अभयारण्यात असलेल्या वीटभट्ट्यामुळे वन्य प्राण्याच्या जीवाला धोका निर्माण झाल्याबाबतची बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिसरात वाढलेल्या वैध-अवैध वीटभट्ट्यांमधील आगीमुळे वनपरिक्षेत्रात वणवा लागण्याची व पर्यावरणाची हानी होण्याची दाट शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या वीटभट्ट्यांच्या परवान्याला मंजूरी देणाऱ्या व नुतनीकरण करणाऱ्या वन व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांवर कडक कार्यवाही करण्यात आली आहे काय, त्याचे स्वरुप काय,
(४) नसल्यास, कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-११-२०१६)** :(१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत झालेल्या कामातील २५ टक्के कामे निकृष्ट असल्याबाबत**

**(३०) ५७९४८ (२४-०८-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत झालेल्या कामातील २५ टक्के कामे निकृष्ट असल्याचा अहवाल शासकीय तंत्रनिकेतनमधील तज्ञांनी लातुर जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तद्नंतर निकृष्ट कामांची दुरुस्ती संबंधित कंत्राटदरांनी स्वखर्चाने करावी असे आदेश जिल्हाधिकारी लातूर यांनी दिली असून तद्नंतरच्या कामाबाबत तसेच राज्यात सर्वत्र या योजनेअंतर्गत होत असलेल्या कामाबाबत शासन चौकशी करुन आवश्यक कार्यवाही केली आहे काय वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-११-२०१६) :**(१) होय, अंशत: खरे आहे.

लातूर जिल्ह्यात जलयुक्त शिवार अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये झालेल्या कामातील १९ टक्के कामे निकृष्ट असल्याचा अहवाल त्रयस्त पक्षाकडील अंकेक्षण करणारे शासकीय तंत्रनिकेतन मधील पथकाने लातूर जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

निविदेतील अटी व शर्तीनुसार कामातील दोष व दायित्व कालावधी ५ वर्षाचा असल्याने ठेकेदाराकडून स्वखर्चाने कामातील दोष दुरुस्त करण्यात येत आहे

राज्यात ४ जलयुक्त शिवार योजनेंतर्गत होणाऱ्या कामांची तपासणी करणेसाठी विविध पातळीवर तपासणी यंत्रणा गठीत करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानात हजारो कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(३१) ५८२४४ (२४-०८-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलयुक्त शिवार अभियानात नांदेड जिल्ह्यात हजारो कामे झाली असली तरी थर्ड पार्टी ऑडिट झाले नसल्याने त्या कामाच्या गुणवत्तेबाबत शाशंकता असल्याचे व हमखास पाणी येणाऱ्या भागातच जलयुक्त शिवार अभियांनांतर्गत जलसंधारणाच्या कामासाठी नाममात्र यंत्रणा असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड महानगरचा झपाट्याने विस्तार होत आहे चार वर्षापूर्वी काही गावे मनपा हद्दीत समाविष्ट करण्यात आली आणखीही काही गावे प्रस्तावित आहेत असे असूनही जलयुक्त शिवार अभियातातर्गत जलसंधारणाची कामे अपुरी असल्याने नागरीकांनी पाण्याअभावी गैरसोय होत आहे, हे लक्षात घेता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१५-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

नांदेड जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये १६ तालुक्यातून २६१ गावांची निवड करण्यात आली आहे. तसेच सदर अभियांनांतर्गत करण्यात आलेल्या कामांचे त्रयस्थ संस्थामार्फत मूल्यांकन करण्यात आलेले आहे.
(२) शासनाच्या दि.०२ जानेवारी, २०१५ व १४ ऑगस्ट, २०१५ चे पत्रान्वये जलयुक्त शिवार अभियान गाव निवड निकष ठरविण्यात आले आहेत. त्यानुसार गावांची निवड करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंगणवाडी कर्मचारी संघाच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(३२) ५८२६४ (२४-०८-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंगणवाडी कर्मचारी संघाने प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोलापूर जिल्हा परिषदेच्या धरणे आंदोलन केले असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अत्यल्प मानधनावर काम करणाऱ्या अंगणवाडी सेविकांना मानधनाऐवजी वेतनश्रेणी लागू करा, शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्या, सेवानिवृत्ती वेतन द्या, अनुकंपा तत्वावर वारसांना सेवेत भरती करुन घ्यावे, सेविका सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या रिक्त जागी सेविकेची सून किंवा मुलीला सेवेत घ्यावे ही प्रमुख मागणी या सेविकांनी केली आहे तरी याबाबत शासन विचाराधीन आहे अथवा नाही,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-११-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र शासनाची योजना राज्य शासनामार्फत राबविण्यात येत आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या मॅन्यअल प्रमाणे अंगणवाडी सेविका/मदतनीस ही पदे मानधनी स्वरुपाची असून त्यांचे अंगणवाडीतील कामकाजाची वेळ फक्त ४ तास इतकी असल्यामुळे त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देणे संयुक्तीक होणार नाही मा.सर्वोच्च न्यायालयाने याप्रकरणी दिनांक ७.१२.२००६ रोजी अंगणवाडी सेविका/मदतनीस ही मानधनी पदे असून त्यांची पदे ही नागरी पदे नसल्याचा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा नाही.

अंगणवाडी सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविका यांना सेवानिवृत्तीनंतर एल.आय.सी. योजनेअंतर्गत एकरकमी लाभ देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ३० एप्रिल, २०१४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

---

**राज्यात मागील साडे तीन वर्षात तब्बल एक लाख हेक्टर जंगल वणव्यामुळे जळून खाक नष्ट झाले असल्याबाबत**

**(३३) ५८४१५ (२४-०८-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील साडे तीन वर्षात तब्बल एक लाख हेक्टर जंगल वणव्यामुळे जळून खाक झाले असल्याचे माहे मे २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, तीन हजार पेक्षा जास्त वणवे हे लोकांनी लावले आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, गेल्या काही दिवसात ताडोबा, टिपेश्वर या जंगलामध्ये वणवा पेटल्यामुळे मोठया प्रमाणात नुकसान झाले असून नागपूर, चंद्रपूर व नाशिक याभागात सर्वाधिक आगी लागल्या आहेत, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, वणव्यांपासून जंगलाचे संरक्षण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-११-२०१६)** :(१) राज्यात मागील साडे तीन वर्षात ११८८८ घटनांमध्ये एकूण ८३९५५.२६ हेक्टर वनक्षेत्रावर वन वणवा लागला असून त्यामध्ये पालापाचोळा/गवत जळालेले आहे, जंगल नष्ट झालेले नाही.

(२) वनास अनेक कारणांमुळे वेगवेगळ्या प्रकारे लोकांद्वारे आगी लावण्यात येतात. कधी अनवधानाने तर कधी निष्काळजीपणामुळे आगी लागतात. आग लावणारे इसम जंगलात जाऊन आग लावून पळून जातात. वणवा निदर्शनास आल्यानंतर वनकर्मचारी जोपर्यंत प्रत्यक्ष वणव्याच्या ठिकाणी पोहोचतात, तोपर्यंत आगी लावणारे गुन्हेगार घटना स्थळावरुन पसार झालेले असतात. त्यामुळे अनेक प्रकरणी आरोपींना रंगेहाथ पकडता येत नाही. त्यामुळे किती लोकांनी आगी लावल्या हे निश्चितपणे ठरविता येत नाही.

(३) सन २०१६ मध्ये ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातंर्गत १५८ आगीच्या घटना असून यात १५५१.६९ हे. वनक्षेत्र जळाले आहे. टिपेश्वर या अभयारण्य क्षेत्रात १७ आगीच्या घटना घडल्या असून यात १७७६.०० हे. क्षेत्र जळाले आहे. परंतु, त्यामध्ये केवळ गवत पालापाचोळा जळाला असून मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले नाही.

नागपूर वनवृत्तामध्ये आगीच्या घटना ३९२ असून यात जळालेले वनक्षेत्र २१८४.७५ आहे. चंद्रपूर मध्ये आगीच्या घटना १९७ असून यात जळालेले वनक्षेत्र ४२९.२८ हे. आहे व नाशिक मध्ये आगीच्या घटना १७१ असून यात जळालेले वनक्षेत्र ५४७.७६ हे. आहे.

(४) व (५) राज्यातील जंगलाचे वणव्यापासून रक्षण करण्याकरीता सन २०११-१२ मध्ये ११ मोबाईल व्हॅन व ११ फायर फायटिंग युनीट वनवृत्ताला फायर ब्लोअर खरेदी करुन व वापरासाठी वाटप करण्यात आले आहेत. वन अधिकारी/कर्मचारी यांना गस्तीसाठी वाहनांचा पुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच सर्व वनवृतताला आतापर्यंत ६५४२/PDA smart Phone तसेच NRSA, Hyderabad कडून Fire alerts प्राप्त होत आहे. आग विझविण्याकरीता उपकरण क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना वाटप करण्यात आले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाने आगीवर नियंत्रण ठेवण्यात येते.

---

**राज्यातील प्रत्येक जिल्हयात "अहिल्याबाई होळकर महिला**
**बाजारपेठ स्थापन करण्याबाबत केलेल्या घोषणेबाबत**

**(३४) ५८८१५ (२४-०८-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक जिल्हयात "अहिल्याबाई होळकर महिला बाजारपेठ " स्थापन करण्याची घोषणा मा.वित्त मंत्र्यांनी सन २०१५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली होती, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर योजनेच्या माध्यमातून बचत गटांच्या हजारो महिला सदस्यांना शाश्वत स्वरूपाचा रोजगार उपलब्ध होणार होता, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, या योजनेकरिता सुमारे २०० कोटी रूपयांचा निधी अर्थसंकल्पात चिन्हांकित करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदर चिन्हांकित निधी दिनांक ३१ मार्च २०१६ अखेर व्यपगत होणार असल्याबाबत आयुक्त, महिला व बालकल्याण यांना वारंवार पत्रव्यवहार करूनदेखील कार्यवाही होऊ शकली नाही, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास सदरची बाजारपेठ स्थापन न होण्यामागची कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-११-२०१६) :**(१), (२) व (३) होय.

(४) व (५) मा.मंत्री (वित्त) यांच्या सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय भाषणामधील चिन्हांकित रक्कमा दर्शविलेल्या योजनासंदर्भात कार्यवाही करण्याबाबत दि.३०.७.२०१५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तुंसाठी बाजारपेठ/विक्री केंद्र निर्माण करण्याची कार्यवाही ग्राम विकास विभागाकडून केली जाते, त्यामुळे महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंच्या विक्रीसाठी जिल्हास्तरावर कायमस्वरुपी "पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर बाजारपेठ" निर्माण करणे ही नवीन योजना ग्राम विकास विभागामार्फत राबविण्याबाबत नियोजन विभागाने सुचित केल्यानुसार तसेच बाजारपेठ विक्रीकेंद्र निर्माण करण्याची बाब ग्रामविकास विभागाशी संबंधित असल्याने व बाजारपेठ निर्माण करण्याबाबतची यंत्रणा महिला व बाल विकास विभागाकडे उपलब्ध नसल्याने सदर योजना ग्राम विकास विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली. तथापि, सद्यस्थितीत ग्राम विकास विभागाकडे सुरु असलेली

तालुकास्तरीय विक्री केंद्राची योजना बंद करण्याबाबत त्या विभागाकडे प्रस्ताव विचाराधीन असल्याने व सदरची नवीन योजना राबविणेसाठी ग्राम विकास विभागाकडे यंत्रणा उपलब्ध नसल्याने सदर योजना ग्राम विकास विभागामार्फत राबविणे शक्य नसल्याचे ग्राम विकास विभागाने कळविले. सदर योजना पूर्णत: नवीन असल्याने त्यासाठी प्रशासकीय मान्यता देणे, नवीन लेखाशिर्ष उपलब्ध करुन घेणे या बाबी दि.३१ मार्च, २०१६ पूर्वी पूर्ण करणे शक्य नसल्याने यासाठी चिन्हांकित केलेला नियतव्यय वापरणे सन २०१५-१६ मध्ये शक्य झालेले नाही.

---

### सुकन्या योजनेच्या जाचक अटीमुळे लाभार्थ्यांना लाभ मिळत नसल्याबाबत

**(३५) ५९३४७ (२४-०८-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलींचा जन्मदर कमी असणा-या महाराष्ट्रातील दहा जिल्ह्यामध्ये बुलडाणा जिल्ह्याचा समावेश आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, मुलींच्या जन्मदरात वाढ करण्यासाठी शासनाने सुकन्या योजना सुरू केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेतील जाचक अटींमुळे लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ न मिळता निधी परत जात असल्याची बाब माहे मार्च, २०१६ अखेरीस निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या बाबत शासन स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे

(५) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-११-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

सदर योजनेचा प्रत्यक्ष लाभ मुलीच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणार असून भारतीय आयुर्विमा महामंडळाकडे प्राप्त अर्जानुसार व भारतीय आयुर्विमा महामंडळाने केलेल्या अनुदान मागणीनुसार त्यांना रक्कम अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर जिल्ह्यातील काळम्मावाडी धरण स्थळाजवळील वन्यजीव विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानात सोयी सुविधा देण्याबाबत

**(३६) ५९५७१ (२३-०८-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील काळम्मावाडी धरण स्थळाजवळ लाखो रुपये खर्च करुन वन्यजीव विभागाच्या कर्मचाऱ्यांसाठी उभारलेली निवासस्थाने केवळ वीज व पाणी सुविधा नसल्याने १० वर्षापासून विना वापर पडून आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवासी इमारतीच्या दुरुस्ती बरोबरच वीज व पाणी सुविधा निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रस्तावाला मंजूरी देवून त्यासाठी तातडीने निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-११-२०१६)** :(१), (२) व (३) राधानगरी अभयारण्य क्षेत्रातील वन कर्मचाऱ्यांसाठी मौजे आसनगाव येथे १ व्दिघटक व १ घटक अशा २ इमारती रु.५.०० लक्ष खर्च करुन बांधण्यात आल्या आहेत. सदर इमारती नादुरुस्त व कर्मचाऱ्यांच्या वापरायोग्य नसल्याने १ एक घटक इमारत माहे ऑगस्ट, २०१२ पासून व १ व्दिघटक इमारत माहे मे, २०१३ पासून बंद स्थितीत आहेत. त्यामुळे सदर इमारतीची वीज व पाणी सुविधा बंद करण्यात आली आहे.

उपरोक्त इमारतींच्या दुरुस्तीचे काम सन २०१६-१७ ह्या आर्थिक वर्षात प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर इमारतींच्या दुरुस्ती करीता रु.८.९९ लक्ष इतका खर्च अपेक्षित असून त्याकरीता निधी देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात आरोग्य विभागाकडून कावीळीविषयी जनजागृती होत नसल्याबाबत**

**(३७) ६००१६ (३०-०८-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रत्येक वर्षी १९ मे हा जागतिक कावीळ दिन साजरा केला जातो. तथापि या विषयाबाबत शिबिरे, जनजागृतीच्या पार्श्वभूमीवर अहमदनगर जिल्हा आरोग्य विभागाकडून हा जागतिक कावीळ दिन साजरा झाला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्य विभागाकडून कावीळीविषयी जनजागृती होत नसल्याने या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी आरोग्य विभागास अपयश येत असल्याने रुग्ण शासकीय दवाखान्यात न येता, खाजगी दवाखान्यात जातात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१३-१४, २०१४-१५ व सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात शासनाच्या आरोग्य विभागाकडे येणाऱ्या रुग्णांची संख्या किती आहे
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे?

**डॉ. दीपक सावंत (२२-११-२०१६)** :(१) हे खरे नाही.

आरोग्य सेवक आणि सेविका आपल्या नियमित गृहभेटींमध्ये कावीळसह सर्व जलजन्य आजारांच्या प्रतिबंध व नियंत्रणसंदर्भात जनतेचे आरोग्य शिक्षण करता असतात.

जागतिक कावीळ दिन दरवर्षी २८ जुलै, रोजी विविध आरोग्य विषयक उपक्रमांनी साजरा करण्यात येतो.
(२) हे खरे नाही.
(३) सार्वजनिक आरोग्य विभागाकडे उपचारासाठी आलेलया एकूण रुग्णांची वर्षनिहाय संख्या पुढीलप्रमाणे आहे.

| वर्ष | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|
| बाह्यरुगण | १,७२,०६२० | १,७८,६९८४ | १,८५,८६१६ |
| आंतररुग्ण | ४६,३४८ | ४५,६३२ | ६०,३७६ |
| एकूण | १,७६,६९६८ | १,८३,२६१६ | १,९१,८९९२ |

(४) उपरोक्त आकडेवारी पाहता सार्वजनिक आरोग्य विभागाकडून उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या दरवर्षी वाढत आहे.

---

**राज्यातील स्वयंसहायता बचत गटांच्या डिजिटायझेशनचा नाबार्ड ई शक्ती हा उपक्रम राबविण्याबाबत**

**(३८) ६०१९८ (२४-०८-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील स्वयंसहायता बचत गटांच्या डिजिटायझेशनचा नाबार्ड ई शक्ती हा उपक्रम राबविण्यात येईल अशी माहीती मा.मुख्यमंत्री यांनी दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास सदर उपक्रम राबविण्याबाबत शासनाने निर्णय घेवून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :**(१) होय.
(२) सदर उपक्रम प्रायोगिक तत्वावर नाबार्डमार्फत राबविण्यात येत असून त्यामध्ये धुळे जिल्ह्यात महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) चे धुळे कार्यालय सहभागी आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात पालकांकडून बालकास होणाऱ्या एचआयव्ही एड्स प्रतिबंधात्मक कार्यक्रमाबाबत**

**(३९) ६०२५० (३०-०८-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, मुंबई नॅशनल एड्स कंट्रोल सोसायटी दिल्ली अंतर्गत विविध संस्थेमार्फत राज्यात पालकांकडून बालकास होणाऱ्या एचआयव्ही एड्स प्रतिबंधात्मक कार्यक्रम काम करणाऱ्या एचआयव्ही एड्स प्रतिबंधात्मक कार्यक्रम करणाऱ्या बाहयक्षेत्रीय कर्मचाऱ्यांचे (ओआरडब्लु) काम बंद करुन शासकीय कर्मचाऱ्यांकडून एचआयव्ही बाधीत गरोदर मातांची व बालकांची देखरेख करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात या प्रकल्पा अंतर्गत काम करणाऱ्या ७५० कर्मचाऱ्यांचे काम बंद होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पामुळे गेल्या १० वर्षात एचआयव्ही बाधीत महिलांकडून होणाऱ्या बाळांना एचआयव्हीची बाधा होण्याचे प्रमाण देखील कमी झाल्याचे दिसून आले असतांना हा प्रकल्प बंद करण्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) तसेच, उक्त प्रकल्प बंद केल्यामुळे बेरोजगार होणाऱ्या कर्मचारी (ओआरडब्लु) यांना रोजगार देण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे?

**डॉ. दीपक सावंत (२१-११-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

नॅशनल एड्स कंट्रोल संस्था, नवी दिल्ली यांच्या अनुदानातून विविध संस्थामार्फत महाराष्ट्र राज्यात पालकांकडून बालकांस होणारे एचआयव्ही एड्स प्रतिबंधात्मक कार्यक्रम बाह्यक्षेत्रीय कर्मचाऱ्यांकडून राबविण्यात येते होता. तथापि नॅकोच्या सूचनेनुसार माहे, ऑक्टोबर, २०१५ पासून प्रकल्प बंद करुन सद्यस्थितीत आरोग्य विभागाकडील ए.एन.एम. आशा (ASHA) कर्मचाऱ्यांकडून व महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेच्या समुपदेशकांकडून हे काम करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) या प्रकल्पामुळे गेल्या १० वर्षात पालकांकडून बालकांना होणाऱ्या एचआयव्हीची बाधा होण्याचे प्रमाण कमी झालेले आहे. तथापि उक्त प्रकल्प नॅकोने बंद करुन तपासणीचे काम आरोग्य विभागाकडील कर्मचाऱ्यांकडून करुन घेण्यास सूचविले आहे.

(४) उक्त प्रकल्प बंद झाल्यामुळे प्रकल्पांतर्गत काम करणाऱ्या बाहय क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना (ओआरडब्ल्यु) केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या आरोग्य विभागाच्या इतर योजनांमध्ये सामावून घेण्याच्या पर्यायाची तपासणी करण्यात येत आहे.

---

### महिला व बालविकास विभागाच्या बालधोरण समितीबाबत

**(४०) ६०५२९ (२४-०८-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००९ ते २०१४ या काळात तत्कालीन मा.महिला व बाल विकास मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्याचे बालधोरण निश्चित करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासमितीचे स्वरुप काय होत तसेच समितीने तयार केलेल्या बालधोरणाच्या मसुद्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्यापपर्यंत, सदर समिती स्थापन करण्यात आली नसल्यास त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-११-२०१६) :**(१) होय.
(२) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, दिनांक ६/६/२०१३ अन्वये बाल धोरण निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचे अध्यक्ष मा.मंत्री महिला व बालविकास व उपाध्यक्ष, मा.राज्यमंत्री, महिला व बालविकास आहेत. तसेच या समितीमध्ये विधानसभा/विधानपरिषद सदस्य, प्रधान सचिव, महिला व बाल विकास, आयुक्त महिला व बाल विकास व बाल क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती अशा एकूण ६३ सदस्यांचा समावेश असून सचिव, बाल हक्क संरक्षण आयोग हे सदस्य सचिव आहेत. तसेच राज्याचे दुसरे बाल धोरण जाहिर करण्यासंदर्भात दिनांक ४ मार्च, २०१४ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देहू रोड कॅन्टोनमेंट बोर्डच्या आरोग्य केंद्राबाबत**

**(४१) ६०७६६ (३०-०८-२०१६). श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देहूरोड कॅन्टोनमेंट बोर्डने चिंचोळी (जि.पुणे) येथे राज्य शासनाच्या राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियनाअंतर्गत दिनांक १९ फेब्रुवारी, २०१५ रोजी आरोग्य कैंद्र सुरु केले होते, हे खरे आहे काय
(२) असल्यास, शासनाने निधी दिलेला असतांनाही देहूरोड कॅन्टोनमेंट बोर्डने वैदकीय अधिकारी व आवश्यक कर्मचारी नियुक्त न केल्याने हे आरोग्य केंद्र बंद पडले आहे, हे खरे आहे काय
(३) असल्यास, या आरोग्य केंद्रासाठी बोर्डाला देण्यात आलेल्या निधीचा वापर न करणाऱ्या बोर्डाच्या पदाधिकार्यावर शासन काय कारवाई करणार आहे
(४) सदर आरोग्य केंद्र शासन स्वत: ताब्यात घेवून चालवण्यासंदर्भात काय कार्यवाही करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२१-११-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत रीतसर पदभरती करुन भरण्यात आलेल्या कंत्राटी पदांवर सद्य:स्थितीत १ वैद्यकीय अधिकारी व ८ इतर कर्मचारी नागरी आरोग्य केंद्रामध्ये कार्यरत आहेत व नागरी आरोग्य केंद्रात सेवा नियमित चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**झालटा (जि.औरंगाबाद) गावातील जलशिवार कार्यक्रमानंतर नेते, कार्यकर्त्यासह १०० जणांना डोळ्यातून पाणी व सूज येऊन डोळयांचा त्रास जाणवू लागल्याबाबत**

**(४२) ६०९५५ (३०-०८-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झालटा (जि.औरंगाबाद) गावातील जलशिवार कार्यक्रमानंतर नेते, कार्यकर्त्यासह १०० जणांना डोळ्यातून पाणी व सूज येऊन डोळयांचा त्रास जाणवू लागल्याचे दिनांक १३ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२२-११-२०१६) :**(१) होय, हे अंशतः खरे आहे.

या घटनेत डोळ्याचा त्रास जाणवू लागलेल्या रुग्णांची संख्या ४९ होती.

(२) होय.

प्रथम आरोग्य पथकाद्वारे सर्व्हेक्षण करण्यात आले त्यात ४९ जणांना त्रास असल्याचे आढहून आले. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी उपसंचालक आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळ, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली ४ सदस्यीय चौकशी समिती गठीत केली होत सदरील समितीने चौकशी करुन आपला अहवाल सादर केला आहे.

(३) चौकशी समितीच्या निष्कर्षा प्रमाणे दि. १२/६/२०१६ रोजी सायंकाळी आयोजित कार्यक्रम प्रसंगी लावलेल्या बल्बमुळे लोकांना व कार्यकर्त्यांना डोळे दुखी, सुज आणि पाणी येणे असा त्रास झाला, तथापि, औषधोपचाराने तो पूर्णपणे बरा झाला असून कोणत्याही प्रकाराचा दृष्टीदोष आढळून आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कोहिंडे बु. (ता.खेड, जि.पुणे) येथील वन विभागाच्या हद्दीतील मोरांना व इतर प्राण्यांना पिण्याच्या पाण्याकरिता कोणतीच सुविधा उपलब्ध नसल्याबाबत**

**(४३) ६१२५४ (२४-०८-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोहिंडे बु. (ता.खेड, जि.पुणे) येथील वन विभागाच्या हद्दीतील मोरांना व इतर प्राण्यांना पिण्याच्या पाण्याकरिता कोणतीच सुविधा वन विभागाच्या हद्दीत नसल्याचे माहे मे, २०१६ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोरांना व इतर प्राण्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी याकरिता वनतळे होणेबाबतचा प्रस्ताव वनपरिक्षेत्र अधिकारी,खेड यांनी विभागीय कार्यालय, जुन्नर यांसकडे माहे मे २०१६ वा त्यासुमारास पाठविला आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोहिंडे बु. येथे वनतळे बांधणेबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-११-२०१६) :**(१) हे खरे नाही. सद्य:स्थितीत मौजे कोहिंडे बु. पुणे जि.खेड, ता.येथे वनकक्ष क्रमांक २५९ मध्ये मोर व इतर वन्यप्राण्यांसाठी दोन साठवण तळी व दोन वनतळी तयार करण्यात आलेली आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) सन २०१६-१७ मध्ये जिल्हा वार्षिक योजना, बिगर आदिवासी योजनांतर्गत वन्यप्राण्यांना पिण्याच्या पाण्यासाठी एका वनतळ्याचे काम प्रस्तावित करण्यात आले आहे.

---

## मुंबई उपनगर व ठाणे क्षेत्रातील ३८ नामवंत विकासकांकडून प्रकल्प मुल्य निश्चित करतांना शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याबाबत

**(४४) ६१८६८ (२४-०८-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगर व ठाणे क्षेत्रातील ३८ नामवंत विकासकांकडून इमारतीचे बांधकाम करतांना संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीपासून १० कि.मी. पर्यंत २०,००० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या इमारतीचे बांधकाम करताना राष्ट्रीय वन्यजीव मंडळांची परवानगी घेणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर विकासकांकडून २०,००० चौ.मी पेक्षा जास्त इमारतीचे बांधकाम करताना एकूण प्रकल्प मुल्याच्या २% प्रमाणे रक्कम शासनाच्या वन विभागास अदा करणे आवश्यक असते, हे ही खरे आहे काय,
(३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी यांनी त्यांचे पत्र क्रमांक का.अ./उमुंवि/प्रशा/३४०३ दिनांक २९/३/२०१६ नुसार प्रकल्प मुल्य निश्चित करतांना जमिनीची किंमत रेडीरेकनरनुसार व बांधकाम खर्च दरसूची सन २०१५-२०१६ रु.२८५००/- व प्रत्येक मजल्याकरिता अतिरिक्त ०.५०% वाढविण्याचे अप्पर प्रधान मुख्य संरक्षक (वन्यजीव), बोरीवली यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,
(४) तसेच मुंबई उपनगर क्षेत्रातील निवासी व वाणिज्य इमारत बांधकामाचे अवस्था-१ चे दर (Stage १-Estimate) भूमी अभिलेख विभाग/मुल्यांकन विभागांकडून प्राप्त करुन घेणेबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्र. कक्ष-२४/वअ/प्रशा-४/१५४२/२०१५-१६ दिनांक ३० मार्च, २०१६ नुसार अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), मुंबई यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,

(५) तथापि माहे सप्टेंबर २०१५ ते मे २०१६ या कालावधीत एकूण अंदाजित ५२ इमारतीच्या बांधकामाच्या प्रस्तावात प्रकल्प मुल्य एकूण रु. ३५,७००/- कोटी नुसार २% प्रमाणे वन विभागास एकूण रु. ६४९.९४/- कोटी रुपये मिळणे अपेक्षित असतानाही रु. ४३२.३५/- कोटी शासनास मिळून मुख्य वनसंरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व अप्पर मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांच्या गैरकारभारामुळे शासनाचे अंदाजे रु. २१७.५९/- कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे, हेही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाच्या कोटयवधी रुपयांचे नुकसान करणाऱ्या संबंधित विकासकांवर व त्यांस जबाबदार असणाऱ्या मुख्य वनसंरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, अप्पर मुख्य वनसरंक्षक (वन्यजीव) व इतर संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-११-२०१६) :**(१) हे खरे आहे. संरक्षित क्षेत्राच्या हद्दीपासून १० कि.मी पर्यंत २०००० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या इमारतीचे बांधकाम करताना राष्ट्रीय वन्यजीव मंडळांची आहे परवानगी घेणे आवश्य.

(२) संरक्षित क्षेत्र व त्यांच्या हद्दीपासून १० की.मी. पर्यंत जयश विकासात्मक कामांना पर्यावरणीय परवानगी घेताना वन्यजीव मंडळाची शिफारस आवयश्क असते. सदर शिफारस करतेवेही मुख्य वन्यजीव रक्षक किंवा राज्य वन्यजीव मंडळा वन्यजीव अधिवास विकासासाठी काही अशी व शर्ती घालू शकते. मात्र एकूण प्रकल्प मुल्याच्या २% प्रमाणे रक्कम शासनाच्या वन विभागास अदा करणे अशी अट/शर्त अनिवार्य नाही.

(३) हे खरे आहे.

(४) मुंबई उपनगर क्षेत्रातील निवासी व वाणिज्य इमारत बांधकामाचे अवस्था १-चे दर (Stage १- Estimate) भूमी अभिलेख विभाग/मुल्यांकन विभागांकडून प्राप्त करुन घेण्यात यावे किंवा कसे? याबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई यांनी वन अभियंता महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे विचारणा करण्यात आली असता त्याप्रमाणे वन अभियता महाराष्ट्र राज्य नागपूर यांनी कळविले आहे.

(५) हे खरे नाही.

३५ प्रकल्पयंत्रणांचे प्रस्ताव राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या परवानगीसाठी सादर करण्यात आले आहेत. सदर प्रकल्प यंत्रणांनी दिलेल्या दाखल्यानुसार रु.१५६१२.६२ कोटी इतक्या रक्कमेवर २% प्रमाणे सुमारे रु.३१२.२५ कोटी रक्कम जमा करण्याबाबतची शिफारस करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत सर्व जिल्हा परिषदेअंतर्गत पर्यवेक्षिका, महिला व बाल विकास खात्याकडे हस्तांतरीत करण्याबाबत**

**(४५) ६२५०१ (२४-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत सर्व जिल्हा परिषदेअंतर्गत पर्यवेक्षिका, महिला व बाल विकास खात्याकडे हस्तांतरीत करण्यात यावे व बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांची सर्व पदे पर्यवेक्षिकांमधून भरण्यात यावीत असे निवेदन महाराष्ट्र राज्य आयसीडीएस पर्यवेक्षिका कृती समिती, ठाणे, जि.ठाणे यांनी व लोकप्रतिनिधी यांनी मा.महिला व बाल विकास मंत्री महोदयांना दिनांक १० एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) याबाबतचा प्रस्ताव कार्यवाहीत असून, त्यावर अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील पंढरपूर तालुक्यात गत ३ वर्षापासून अंगणवाडीस प्रकल्प अधिकारी नसल्याबाबत**

**(४६) ६२६८१ (२४-०८-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील पंढरपूर तालुक्यात ३८ कुपोषित बालके आढळून आल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ३ वर्षापासून अंगणवाडीस प्रकल्प अधिकारी नसल्याने अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मनमानी कारभाराने बालकांपर्यंत पोषण आहार पोहचत नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंढरपूर तालुक्यात प्रकल्प अधिकाऱ्यांची त्वरीत नेमणूक करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-११-२०१६) :**(१) होय.

(२) नाही.

महिला व बाल विकास आयुक्तालयांतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी (गट-ब) ची पदे रिक्त असली तरी पर्यायी व्यवस्था म्हणून बाल विकास प्रकल्प अधिकारी, पंढरपूर - १ व बाल विकास प्रकल्प अधिकारी, पंढरपूर-२ या पदांचा अतिरिक्त कार्यभार इतर अधिकारी यांच्याकडे देण्यात आलेला आहे. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्यावर प्रभारी बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्यामार्फत नियंत्रण करण्यात येत असून अंगणवाडी मधील बालकांपर्यंत पोषण आहार दररोज नियमितपणे पुरविण्यात येत आहे.
(३) महिला व बाल विकास आयुक्तालयात गट-ब संवर्गातील रिक्त पदांपैकी सरळसेवेच्या कोट्यातील १४७ पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस प्राप्त झाली आहे. सदर उमेदवांराची निवडे यादीनुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत असून सदर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विभागीय संवर्ग वाटप नियमानुसार राज्यातील रिक्त पदी सदर उमेदवारांची पदस्थापना करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड शहरात केंद्र शासनाची राष्ट्रीय आरोग्य अभियान योजना राबविण्याबाबत**

**(४७) ६३२३८ (३०-०८-२०१६). श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड शहरात केंद्र शासनाची राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान योजना राबवण्याकरिता प्रकल्प आराखड्यास वैद्यकीय विभागाने मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर योजना गत तीन वर्षापासून मनुष्यबळाचा अभाव असल्याने कार्यान्वित झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजना पूर्णपणे कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-११-२०१६)** :(१) पिंपरी-चिंचवड शहरात राष्ट्रीय शहरी आरोग्य योजना राबविण्याकरिता प्रकल्प आराखड्यास केंद्र शासनाने मंजूरी दिली आहे.
(२) व (३) राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत राज्य स्तरावरुन वेळोवेळी पदभरती संदर्भात महानगरपालिकांना सक्त सूचना तसेच दि.२०.७.२०१६ रोजी प्रत्यक्षात आढावा बैठक घेऊन पदभरती त्वरीत करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेसाठी सन २०१५-१६ च्या प्रकल्प आराखड्यात एकूण २८७ पदे मंजूर होती त्यापैकी ११६ पदे भरण्यात आली असून १७१ पदे रिक्त आहेत. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने पदभरती जाहिरात टप्पा-१ व पदभरती जाहिरात टप्पा-२ नुसार पदांची जाहिरात देऊन पदभरती केलेली आहे. उर्वरित रिक्त पदांची भरती प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूरच्या कृषी विभागाच्या उमरेड तालुक्यासाठी १४ लाख रुपयाचा निधीबाबत**

**(४८) ६३३११ (११-०८-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याला पाणी संकटातून बाहेर काढण्यासाठी "जलयुक्त शिवार" अभियान राबविण्यासाठी नागपूरच्या कृषी विभागाला उमरेड तालुक्यासाठी १४ लाख रुपयाचा निधी देण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी नागपूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी कृषी विभागाला सायंकाळी ५.३० वाजता प्राप्त झाल्याने, जलयुक्त शिवार योजनेच्या कामाची देयके अधिदान कार्यालयाकडे उशिरा सादर करण्यात आल्याने ती नामंजूर करण्यात आल्यामुळे सदर निधी शासनाकडे परत पाठवण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलयुक्त शिवार अभियानाचा निधी कृषी विभागाकडे उशीरा पाठवण्याची कारणे काय आहेत व यासाठी कोण जबाबदार आहे याची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) सदर चौकशी पूर्ण झाली असल्यास निधी उशीरा पाठवण्यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

**प्रा. राम शिंदे (१५-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी बीम्स प्रणाली संथ गतीने सुरु असलयामुळे बीडीएस स्लीप निघाली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातून महिला व बालकल्याण आयुक्तालयाने**
**केवळ ३९८ अर्जांना मंजुरी दिली असल्याबाबत**

**(४९) ६४६२४ (२४-०८-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलीचे शिक्षण, आरोग्य, भविष्यासाठी आर्थिक तरतूद करण्यासाठी शासनाने अडीच वर्षापूर्वी दारिद्रयरेषेखालील कुटूंबासाठी सुकन्या योजना सुरु केली या योजनेसाठी आतापर्यंत अहमदनगर जिल्ह्यातून अंदाजे हजार अर्ज आले असून त्यापैकी महिला व बालकल्याण आयुक्तालयाने केवळ ३९८ अर्जांना मंजुरी दिली असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेनुसार दारिद्रयरेषेखालील कुटूंबात जन्मलेल्या मुलीच्या नांवे आयुर्विमा महामंडळाच्या योजनेतून शासनाने प्रत्येक २१ हजार २०० रुपयांची गुंतवणूक करुन महिला व बालकल्याण आयुक्तालय सदरहू अर्ज मंजूर करण्याबाबत विलंब लावत असल्याने लाभार्थ्यींची गैरसोय होत आहे तरी याबाबत शासन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-११-२०१६) :**(१) नाही.

अहमदनगर जिल्ह्यातून सुकन्या योजनेचे माहे जून, २०१६ अखेर एकूण २१४२ अर्ज भारतीय आयुर्विमा महामंडळास अर्जांना मंजूरी करण्यात आले आहेत. त्यापैकी ४५५ लाभार्थी अर्जांना मंजूरी देण्यात आली असून उर्वरित १६८७ प्रस्ताव भारतीय आयुर्विमा महामंडळाकडे प्रलंबित आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबईतील चेंबूर येथील कस्तुरबा सुधारगृहामधून १६ मुलींनी केलेले पलायन

**(५०) ६४७७५ (२४-०८-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूर येथील कस्तुरबा सुधारगृहामधून शौचालयाच्या खिडकीतून १६ मुलींनी पलायन केल्याची घटना दिनांक २ जुलै,२०१६ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू घटनेबाबत गुन्हा नोंदविण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-११-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) या घटनेबाबत संस्थेकडून दिनांक ०२.०७.२०१६ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, चेंबुर यांना प्रवेशिता निसटून गेल्याची लेखी तक्रार देण्यात आली आहे. सदर घटनेबाबत संस्थेने दिनांक ०२.०७.२०१६ च्या ज्ञापनान्वये जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक ०३.०७.२०१६ च्या पत्रान्वये काळजीवाहक श्रीमती मोंडकर यांना कारणे दाखवा नोटीस दिली आहे.

तसेच विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास, कोकण विभाग त्यांच्या दिनांक ०४.०७.२०१६ च्या आदेशान्वये या घटनेची सखोल तपासणी करण्यासाठी चौकशी समिती गठीत करण्यात आली असून, संबंधितांविरुध्द चौकशी सुरु आहे. चौकशी अहवाल प्रापत होताच त्यांच्याविरुध्द कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**नागपूर.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.